**<u>नि. फौ. खटला क्र.४५/२०२०</u>**

**<u>निशाणी क्र.५०</u>**

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०३ चा पुरावा ::</u>**

**<u>शपथेवर सत्य निवेदन करतो की,</u>**

**<u>माझे नांव</u>** : अंकुश भरत जाधव,

**<u>वय</u>** : ३० वर्षे, **<u>काम</u>** : शेती,

**<u>राहणार</u>** : विळेगाव, ता. देवणी, जि. लातूर.

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::</u>**

मी आरोपींना ओळखतो. त्यापैकी आरोपी अंकूश आणि दत्ता हजर आहेत आणि ईतर आरोपी गैरहजर आहेत. (अर्ज नि.४९ वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र.२ व ४ ची गैरहजेरी माफ केलेली आहे.) दि.०३/०६/२०२० रोजी माझ्या घरासमोर सकाळी १०.०० वाजता घटना घडली. माझी आई त्यावेळी आरोपी अंकुशला खिडकीचे काच कोणी फोडले हे विचारण्यासाठी गेली होती. अंकुशने काच आम्हीच फोडले तुला काय करायचे असे म्हटले आणि शिवीगाळ केली व काठी घेऊन मारण्यासाठी अंगावर आला. अंकुशने माझ्या आईला डोक्यावर मारले. गर्दा झाल्याने मी घराबाहेर गेलो. तेथे भांडण सुरू होते. मी सोडवासोडव केली. त्यानंतर आरोपी दत्ता, विजयाबाई व अभय तेथे आले. सर्व आरोपींनी आम्हाला शिवीगाळ केली आणि मारण्याची धमकी दिली. गावातील लोक तेथे जमा झाले आणि त्यांनी सोडवासोडव केली. मी नमूद काठी बघितल्यास मी ओळखू शकतो. आता मला मुद्देमाल क्र.२/२०२६ मधील दोन काठ्या दाखविल्या. ह्या त्याच आहेत. त्याप्रमाणे लांब काठीला **वस्तूचिन्ह अ** आणि लहान काठीला **वस्तूचिन्ह ब** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**<u>:: आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.बी. पाटील यांच्यामार्फत ::</u>**

०२. मी, माझे वडील आणि भाऊ राहुल सोबत न्यायालयामध्ये आलो. माझा भाऊ श्रीमंत येथे मागील १० वर्षापासून राहतो. तो दिवाळीच्या वेळी गावी येतो. हे म्हणणे

खरे आहे की, माझे घर लोकवस्तीमध्ये आहे व आजूबाजूला अनेकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या दक्षिणेस मंदिर आहे आणि तेथे नेहमी वयस्कर लोक बसलेले असतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर आणि आरोपीचे घर यामध्ये बोळ आहे. परंतु सदर बोळ तीन फुटाचे असल्याचे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी त्यांच्या घराच्या भिंतीला खिडक्या सोडलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरातील सांडपाणी सोडलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, बोळ मुरूमाचे व कच्चे आहे व तेथे सिमेंट काँक्रीट केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गावातील लोकांनी आमचा बोळाचा वाद मिटविला होता. हे म्हणणे खरे नाही की, दोघांच्या खर्चाने बोळामध्ये सिमेंट काँक्रीट करण्याचे ठरले होते व माझ्या वडिलांनी खर्च न दिल्याने सिमेंट कॉन्क्रीट झाले नाही.

०३. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांचे दामाजी पाटील यांच्यासोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मधुकर विळेगावे हे माझ्या वडिलांचे मित्र आहेत. पोलीस दि.०४/०६/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता माझ्याकडे चौकशीकरिता आले होते. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. अंकुशने ''काच आम्हीच फोडले तुला काय करायचे'' असे म्हटले आणि शिवीगाळ केली व काठी घेऊन मारण्यासाठी अंगावर आला व त्याने माझ्या आईच्या डोक्यावर काठीने मारले, हे मी पोलिसांना जबाब देतेवेळी सांगितले होते. सदर मजकूर जबाबामध्ये लिहिलेला नाही. सदर मजकूर का लिहिला नाही याचे मी कारण सांगू शकत नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मी सरतपासामध्ये आरोपी दत्ता बाबत सांगितलेले आहे, अंकुशबाबत सांगितलेले नाही. (साक्षीदाराने या क्षणी त्याची साक्ष बदलल्याचे दिसून येते. सबब त्याची नोंद घेतली.)

०४. गर्दा ऐकू आला त्यावेळी मी आणि माझा भाऊ राहूल घरामध्ये होतो. मी घराबाहेर गेलो त्यावेळी गावातील कोणीही लोक तेथे हजर नव्हते. परंतु आरोपी तेथे हजर होते. माझ्या आईने सरकारी दवाखान्यामध्ये उपचार घेतला. परंतु मी तिच्यासोबत

दवाखान्यामध्ये गेलो नव्हतो.

०५. हे म्हणणे खरे नाही की, दि.०३/०६/२०२० रोजी सकाळी ९.०० ते १०.०० वाजताच्या दरम्यान आरोपी अभय हा आम्हाला बोळातील सांडपाण्याबाबत विचारण्यासाठी आला होता, त्यावेळी मी व माझ्या घरातील सर्वांनी त्यास मारले व रक्ताची जखम केली. हे म्हणणे खरे नाही की, विजयमाला यांनी आमच्याविरुध्द पोलीस ठाण्यामध्ये तक्रार केली होती. आमच्याविरुध्द न्यायालयामध्ये फौजदारी प्रकरण दाखल आहे हे मला माहीत नाही.

०६. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये सांगितल्याप्रमाणे घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये मारहाण, शिवीगाळ आणि धमकी याबाबत संपूर्ण मजकूर खोटा कथन केला. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सर्वांनी विचारविनीमय करून आरोपीविरुध्द केस केली. हे म्हणणे खरे नाही की, आईला मदत होण्यासाठी मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.
दि.०९/०६/२०२६.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.